Wada Nirmiti Education Society's

GURUKUL GLOBAL SCHOOL

WORKSHEET

SUB: Marathi **LESSON:** कथालेखन **STD:**

NAME: _____ ROLL No: _____ DATE:

प्रश्न १. खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे संपूर्ण कथा लिहा.

१. कथालेखनासाठी दिलेले मुद्दे:

एका गावात एक तरुण राहणे...त्याला मोबाईल आणि सोशल मीडियाचे व्यसन असणे...

अभ्यासात दुर्लक्ष आणि सतत नापास होणे...आजोबांचा मोलाचा सल्ला (वेळेचे महत्त्व सांगणे)...

तरुणाचे गांभीर्य लक्षात घेणे...मोबाईलचा वापर मर्यादित करून अभ्यासात लक्ष देणे...परीक्षे उत्तम यश मिळवणे...

तात्पर्य.

२. कथालेखनासाठी दिलेले मुद्दे:

एका गावात दोन मित्र राहणे - अमित आणि सुमित...शाळेत जाताना वाटेत एका झाडाखाली जखमी पाखराचे पिल्लू पडलेले दिसणे...सुमितचे पिल्लाकडे दुर्लक्ष करून पुढे जाणे, तर अमितचे पाखराला उचलून घरी आणणे...अमितने त्याच्यावर औषधोपचार करणे आणि खाऊ घालणे...काही दिवसांत पिल्लू बरे होऊन पुन्हा आकाशात उडून जाणे...परीक्षेचा निकाल लागल्यावर प्रामाणिक कष्टांमुळे अमितला मोठे बक्षीस मिळणे, आणि प्राण्यांवर दया दाखवल्याचे समाधान लाभणे...

तात्पर्य.

३. कथालेखनासाठी दिलेले मुद्दे:

एका जंगलात एक कासव आणि ससा राहणे...सशाला आपल्या वेगाचा खूप अभिमान असणे...

कासवाच्या संथ चालण्यावर सशाने हसणे आणि शर्यतीचे आव्हान देणे...शर्यत सुरू होणे, सशाने वेगाने धावून पुढे निघणे...सशाला वाटेत झोप लागणे, तर कासवाचे न थांबता सतत चालत राहणे...कासवाचे झोपलेल्या सशाच्या पुढे निघून अंतिम रेषा ओलांडणे आणि जिंकणे...

तात्पर्य.

४. कथालेखनासाठी दिलेले मुद्दे:

एका गावात एक प्रामाणिक आणि हुशार मुलगा राहणे - अजय...एका श्रीमंत माणसाची हरवलेली सोन्याची अंगठी अजयला रस्त्यावर पडलेली सापडणे...अजयने ती अंगठी स्वतःजवळ न ठेवता मालकाला परत करण्याचा निर्णय घेणे...तो त्या श्रीमंत माणसाच्या घरी जाऊन अंगठी प्रामाणिकपणे सुपूर्द करणे...श्रीमंत माणसाने अजयच्या प्रामाणिकपणावर खूश होऊन त्याला बक्षीस देणे...सर्वजण अजयच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करणे...

तात्पर्य.

५. कथालेखनासाठी दिलेले मुद्दे:

एका गावात एक गरीब सुतार राहणे...तो जंगलात लाकडे गोळा करण्यासाठी जाणे...एके दिवशी नदीकाठी लाकडे तोडत असताना अचानक त्याची कुऱ्हाड नदीच्या पाण्यात पडणे...सुताराला पोहता न आल्याने आणि गरिबीमुळे खूप रडू कोसळणे...नदीच्या देवाने (जलदेवतेने) प्रकट होऊन सोन्याची कुऱ्हाड दाखवणे, पण सुताराने ती माझी नाही म्हणून नकार देणे...त्यानंतर देवाने चांदीची कुऱ्हाड दाखवणे, सुताराने पुन्हा नकार देणे....शेवटी देवाने त्याची लोखंडी कुऱ्हाड बाहेर काढून देणे, सुताराने ती आनंदाने स्वीकारणे...देव त्याच्या प्रामाणिकपणावर खूश होऊन त्याला तिन्ही कुऱ्हाडी बक्षीस म्हणून देणे...

तात्पर्य.